साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ४ ● मंगळवार, दि. १० ते १७ जुन २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाऊर्जा नवीन प्रशासकीय इमारतीचे उदघाटन

# सर्व शासकीय कार्यालयात सौर ऊर्जेचा वापर सुरु करणार

**पुणे, दि. ७ : राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्धाटन प्रसंगी ते बोलत होते.**

कार्यक्रमाला विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे , खासदार मेधा कुलकर्णी, खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे , आमदार भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ.कादंबरी बलकवडे, महाराष्ट्र राज्य वीज कंपनीचे संचालक विश्वास पाठक, ऊर्जा दक्षता ब्युरोचे सचिव मिलिंद देवरे, अतिरिक्त महासंचालक डॉ. त्रिगुण कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, महाऊर्जासाठी येत्या काळात दोन उद्दीष्टे महत्वाची आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याला गती द्यावी लागेल. प्रधानमंत्री सुर्यघर योजना यशस्वी योजना असून त्या योजनेशी संलग्न असलेली राज्याची योजना सुरू करून पहिल्या टप्प्यात १०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक



सौर ऊर्जेवर आणायचे आहेत. ३०० युनिटपर्यंत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांचे वीजचे देयक शून्यावर यावे असा प्रयत्न आहे. ही दोन्ही उद्दीष्टे पूर्ण करण्यासंदर्भात महाऊर्जा हे काम चांगल्यारितीने करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री मंत्री पुढे म्हणाले, हरित इमारतीसाठी असलेली सर्व मानके पूर्ण करणारी, निसर्गाचा पूर्णपणे उपयोग करणारी, ऊर्जेची बचत करणारी आणि आवश्यक असणारी ऊर्जा १०० टक्के निर्माण करणारी महाऊर्जाची ही नवी इमारत हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. गेल्या २ वर्षात देशभरात ४ लाख कृषी पंप बसाविण्यात आले असतांना राज्याने अपारंपरिक ऊर्जेच्या वापरला प्रोत्साहन देत ५ लाख सौर कृषीपंप बसविले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून १६ हजार मेगा वॉट क्षमतेचे फिडर २०२६ पर्यंत सौर ऊर्जेवर परिवर्तीत करण्यात येणार आहेत. त्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. विभाजीत पद्धतीने असलेला, आशियातील हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. एकूणच सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली असल्याचे श्री. फडणवीस म्हणाले.

## स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटी पुर्ततेसाठी ऑनलाईन अर्ज करा: समाज कल्याण विभागाचे आवाहन

वाशिम,दि.९ जुन (जिमाका) - सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी होस्टल सर्व्हिससाठी अर्ज केलेल्या परंतु विद्यार्थी क्षमतेअभावी शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांमधून सन २०२४-२५ विद्यार्थ्यांनी स्वाधार सर्व्हिस हा पर्याय निवडून अर्ज स्वाधार सर्व्हिससाठी सादर करणे आवश्यक आहे.

तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरिता स्वाधार सर्व्हिससाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या परंतु अद्याप त्रुटीची पुर्तता न केलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दिनांक १० जून २०२५ पर्यंत ऑनलाईन पोर्टल https://hmas.mahait.org वरून तात्काळ विद्यार्थी लॉगिनमधून युजर आयडी व पासवर्डचा वापर दिलेल्या त्रुटीची पुर्तता करून ऑनलाईन अर्ज कार्यालयास सबमिट करणे आवश्यक आहे. दिनांक १० जून २०२५ या मुदतीत त्रुटीची पुर्तता न केलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी पुर्तता न केल्यामुळे बाद ठरविण्यात येतील. याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच सन २०२४-२५ मध्ये स्वाधार योजनेसाठी अर्ज पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पोर्टलवरून बँक तपशील अद्यावत करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सन २०२४-२५ वर्षामधील पात्र विद्यार्थ्यांनी २०२४-२५ या शैक्षणिक सत्रातील दुसऱ्या सहामहाची उपस्थिती परिशिष्ट १ व ३ मध्ये तात्काळ कार्यालयास सादर करण्यात यावी. जेणे करून पात्र लाभार्थ्यांना स्वाधार योजनेच्या दुसरा हप्त्याची रक्कम पात्र विद्यार्थ्यांचे बँक खाती जमा करण्याची कार्यवाही करणे या कार्यालयास सुलभ होईल. दुसऱ्या सत्राची उपस्थिती परिशिष्ट १ व ३ प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांनाच स्वाधार योजनेचा दुसरा लाभ देण्यात येईल. याची सर्व संबंधित पात्र विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.असे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मारोती वाठ यांनी कळविले आहे.

## जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

# जिल्ह्यात जलसंवर्धनास चालना देणार

**वाशिम, दि. ८ जून (जिमाका) – पाण्याच्या संकटावर मात करून राज्यात जलसंपत्तीचा शाश्वत विकास साधण्यासाठी राज्य शासन विविध योजना राबवत आहे. जलसंवर्धन, सिंचन आणि जलयुक्त शिवार यासारख्या उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाशिम जिल्ह्याचा दौरा करून जिल्ह्यातील विविध विकास कामांचा आढावा घेतला.**



राज्याचे जलसंपदामंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) डॉ. राधाकृष्ण विखे पाटील हे आज, ८ जून २०२५ रोजी वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी वाशिम येथील शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यातील विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर आढावा बैठक घेतली.

या बैठकीत जिल्ह्यातील सुरू असलेल्या सिंचन प्रकल्पांचा, जलसंधारण योजनांची अंमलबजावणी, तसेच पाणीटंचाई निवारणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेतला.

बैठकीत बोलताना मंत्री डॉ. विखे



पाटील म्हणाले, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने जलसंपत्तीचा न्याय्य व कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे ही प्राथमिकता आहे. जलसंधारणाच्या योजना प्रभावीपणे राबवून जिल्ह्याचा विकास साधण्याची जबाबदारी आपण सर्वांची आहे.

या बैठकीस विधानसभा सदस्य आमदार श्याम खोडे,जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर,डीपीओ राजेश सोनखासकर, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग शुभम जोशी, मृदू व जलसंधारण कार्यकारी अभियंता श्याम फेरवाणी, जलसंपदा कार्यकारी अभियंता संजय जेवलीकर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सिंचनाची स्थिती, धरणांची सध्याची क्षमता, अपूर्ण प्रकल्पांची माहिती, जलयुक्त शिवार, शाश्वत जलसंधारण, मृद व जलसंवर्धन योजनेची प्रगती यासंदर्भात संबंधित विभागांनी सविस्तर माहिती सादर केली. या बैठकीनंतर मंत्री डॉ. विखे पाटील काही महत्त्वाच्या जलसंपदा प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा हा दौरा जिल्ह्यातील जलव्यवस्थापनास नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास स्थानिक प्रशासन व नागरिकांनी व्यक्त केला आहे.

# मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबली..

मागील आठ ते दहा वर्षांमध्ये आपल्या राज्यात जून महिना संपत आला तरी पुरेसा पाऊस पडला नव्हता. त्यामुळे बऱ्याच वेळा शेतकरी राजाला दुबारा पेरणी करावी लागली होती. यात अनेक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले होते. यावेळी अगदी मे महिन्याच्या प्रारंभापासून पावसाने सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकरी राजा चिंतेत दिसत आहे. शेतीची कामे सोडा. हातातोंडाला आलेल्या पिकाला सुद्धा शेतकऱ्यांना वंचित व्हावे लागणार आहे. तसेच कोपऱ्यात साठलेल्या पाण्यामुळे पिकलेली पिके कुजणार आहेत. याचा परिणाम शेतकरी दादांच्या उत्पादनात घट होणार हे मात्र नक्की. मग संसार चालणार कसा...! तेव्हा मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबली असली तरी शेतात पाणी साचल्यामुळे उन्हाळ्यात पिकलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मागील आठवड्यात कोकण रेल्वेने मुंबईला येताना बऱ्याच ठिकाणी पिकलेले भात वाफ्यात पाणी साचल्यामुळे पाण्यात तरंगताना दिसत होते. काही वाफ्यात भात कापून पसरून ठेवले होते. तेव्हा अशा भाताला कोंब येणार. म्हणजे शेतकरी दादांची उन्हाळी मेहनत पूर्ण पाण्यात जाणार आहे. अशा शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसानभरपाई मिळायला हवी. त्यासाठी ज्या शेतकऱ्यांचे पावसामुळे नैसर्गिक नुकसान झाले असेल त्यांचे पंचनामे करून योग्यती कारवाई शासन पातळीवर होणे गरजेचे आहे. म्हणजे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई मिळाल्यामुळे पुढील शेतीची कामे करणे सोयीचे होईल. यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक शासनमान्य असायला हवा. तरच त्यांना शासकीय विविध योजना व अनुदानाचा लाभ घेता येणार आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवले नसेल तर आपल्या जिल्ह्यातील नागरी सुविधा केंद्रावर तयार करून घ्यावे. सध्याच्या बदलत्या हवामानाचा विचार करता शेतकऱ्यांचे सर्वात जास्त नुकसान होत आहे. ही परिस्थिती शेतीप्रधान देशाला पोषक नाही. उन्हाळ्यामधील मे महिना म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीचा काळ. जमिनीची मशागत करण्यापूर्वी शेत जमिनीत पाणीच पाणी. मग मशागतच झाली नाही, मग सांगा पेरणी कशी करणार. त्याचप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाच्या वतीने शेतकरी चिंतेत असू नये म्हणून विविध माध्यमांच्या माध्यमातून बातम्या प्रसारित करण्यात येत आहेत. कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कृषी विभागाच्या वतीने सन २०२५-२६ या खरीप हंगामासाठी जिल्हा व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये कृषी निविष्ठा उपलब्धता व तक्रार निवारण कक्ष व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. कृषी निविष्ठाची गुणवत्ता, शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण व योग्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. असे जर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात झाले तर शेतकरी राजाला अधिक बळ येईल. महत्त्वाची बाब म्हणजे, शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पुढील दोन आठवड्याने हवामान कोरडे होण्याची शक्यता आहे असे आवाहन राज्यातील कृषी विभागाने शेतकरी बांधवांना केले आहे.

# स्व.पाटील महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा



**रिसोड :** स्थानिक स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एन.गायकवाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करून एका सार्वभौम राज्याची घोषणा केली. राज्याभिषेक सोहळा अत्यंत व्यापक आणि भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा प्रसंग होता. राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजी महाराजांनी छत्रपती हे पद धारण केले. राज्याच्या कारभारासाठी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती करून सुरळीत राज्यकारभारासाठी पदे वाटून दिली.असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.केशव कोकाटे यांनी तर आभार प्रदर्शनइतिहास विभाग प्रमुखप्रा.डॉ.श्रीहरी पितळे यांनी केले. आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.केशव कोकाटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक समितीचे सहकार्य लाभले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. (वि. प्र)

# महेश नवमी निमित्त रिसोड येथे भव्य शोभायात्रा



**रिसोड :** महेश नवमी निमित्त माहेश्वरी समाजाच्या वतीने भव्य दिव्य अशी शोभायात्रा ४ जून २०२५ ला काढण्यात आली ही शोभायात्रा रत्नेश्वर मंदिरापासून निघून रिसोड शहरातील मुख्य मार्गावरून माहेश्वरी भवन येथे पोहोचली यात अनेक महिला , पुरुष लहान मुले या शोभा यात्रेत सहभागी झाले होते तसेच अनेक जागेवर शोभायात्रेवर पुष्पवृष्टी तसेच ठीक ठिकाणी स्वागत करण्यात आले.

या मिरवणुकीत सजवलेल्या ट्रॅक्टर वर भगवान महेश यांची मूर्ती ठेवण्यात आली होती त्यावर जागजागी फुलांचा वर्षाव करण्यात आला महेश पर्व निमित्त अनेक समाज उपयोगी धार्मिक कार्यक्रम माहेश्वरी भावनात राबविण्यात आले महेश नवमी चा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी महिला मंडळ तसेच माहेश्वरी समाज मंडळ माहेश्वरी युवा मंडळ यांनी अथक परिश्रम घेतले (वि. प्र).

# दोन अल्पवयीन चोरट्यासह तीन दुचाकी हस्तगत!
# रिसोड पोलिसांची कार्यवाई




**रिसोड -** गुन्हे उघडकीस आणण्यात सतत आघाडीवर असलेल्या रिसोड पोलीस ठाण्याने पुन्हा एकदा आपली कुशलता सिद्ध केली आहे. पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी एक विशेष कारवाई करत तीन मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणले असून एकूण १ लाख ५ हजार रुपयांच्या तीन दुचाकी वाहनांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वाशिम जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि आधीच दाखल असलेले गुन्हे उकलण्यासाठी सर्व पोलीस ठाण्यांना विशेष सूचना दिल्या होत्या. या पार्श्वभूमीवर रिसोड पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरु ठेवत, चोऱ्यांच्या घटनांवर आळा घालण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली. या मोहिमेदरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पोलिसांनी दोन विधी संघर्ष बालकांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी तीन वेगवेगळ्या ठिकाणाहून मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली. या कबुलीनंतर पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून तीन मोटरसायकल जप्त केल्या. त्यामध्ये -अप.क्र. ४०३/२०२५, कलम ३०३(२) ए अंतर्गत चोरीस गेलेली पॅशन प्रो कंपनीची मोटरसायकल (क्र. एम.एच.३७ एम.२९९९), अंदाजित किंमत ३०,००० रुपये., अप.क्र. ३६८/२०२५, कलम ३०३(२) ए अंतर्गत चोरीस गेलेली स्प्लेंडर प्लस (क्र. एम.एच ३७ ए .बी.०६६५), किंमत ३५,००० रुपये., पॅशन प्रो मोटरसायकल (क्र.एम.एच ३७-१९७७), किंमत ४०,००० रुपये. या तीनही वाहनांची एकूण किंमत अंदाजे १,०५,००० रुपये असून सर्व वाहने जप्त करण्यात आली आहेत.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अनुजतारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, व उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये पो.नि. रामेश्वर चव्हाण यांच्यासह, सफौ संजय घुले, पोहेका महादेव चव्हाण आणि पोका कयूम पठाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.या घटनेमुळे चोरीच्या वाढत्या घटनांमध्ये काहीसा आळा बसण्यास मदत होणार असून, स्थानिक नागरिकांनी या कारवाईबद्दल समाधान व्यक्त केले आहे. पोलिसांचे हे प्रयत्न निश्चितच स्तुत्य असून, गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांची धडक मोहीम भविष्यातही सुरु राहणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

# रिसोड तालुका ग्राहक पंचायतच्या वतीने पर्यावरण दिन साजरा



**रिसोड :** रिसोड तालुका ग्राहक पंचायत च्या वतीने ५ जून रोजी वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत विदर्भ प्रांत यांच्या सूचनेनुसार जागतिक पर्यावरण सप्ताह साजरा करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून रिसोड तालुका ग्राहक पंचायत च्या वतीने आज दिनांक ५ जून रोजी श्री पिंगलाक्षी देवी संस्थान परिसरामध्ये वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

रिसोड तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष कमलकिशोर बगडिया, ज्येष्ठ सदस्य संजय उकळकर, प्रभाकर पाटील गजानन बानोरे, संतोष वाघमारे, सुरज गुप्ता यांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सदरहू वृक्षाचे संगोपन करण्याची जबाबदारी रिसोड तालुका ग्राहक पंचायतने करण्याचे ठरले. याप्रसंगी ग्राहक पंचायत चे इतर सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते. श.प्र.

# आदिशक्ती अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामस्तरावर १५ दिवसांत समित्या स्थापन करा - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

मुंबई, दि. ४ : महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने राबविण्यात येणारे आदिशक्ती अभियान यशस्वी करण्यासाठी १५ दिवसांत ग्रामस्तरीय समित्या स्थापन करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

आदिशक्ती अभियान आणि आदिशक्ती पुरस्कारासंदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी 'आदिशक्ती अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत गाव, तालुका, आणि राज्यस्तरावर समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. विविध विभागांमधील समन्वयाद्वारे महिलांच्या समस्या सोडविणे, योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि स्थानिक पातळीवर महिलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करणे, विधवा प्रथा, हुंडा प्रथा, स्त्री भ्रूण हत्या रोखणे, एकल महिलांच्या योजनांसंदर्भात जनजागृती करणे यासाठी ग्रामस्तरीय समिती काम करणार आहे.आदिशक्ती अभियान हा महिलांच्या सक्षमीकरणाचा एक व्यापक उपक्रम आहे.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक) | R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन सोहळा संपन्न



रिसोड (जिल्हा प्रतिनिधी) दि. ८ : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणा मार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून तो दि.२८.०४.२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादित सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

त्या अनुषंगाने रिसोड येथील नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन कर्तव्यदक्ष उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, कर्तव्यदक्ष तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटा मध्ये संपन्न झाले आहे.सर्व सुविधा एकाच छताखाली मिळत असल्याने यावेळी नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले की आपल्याकडे येणाऱ्या नागरिकांचे समाधान होणे अत्यंत महत्त्वाचे असून त्यावर तुम्ही कार्य करत रहा आमच्या शुभेच्छा तुमच्या सोबत आहे.

असे यावेळी उपविभागीय अधिकारी देवकर यांनी सांगितले आहे.सदर प्रकल्पाकरिता मोलाचे सहकार्य करणारे सौरभ लुणावत जैन (जिल्हा प्रकल्प प्रमुख) जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी मोलाचे मार्गदर्शन केले असून सौरभ जैन यांनी शासकीय धोरणांशी सुसंगत अशा डिजिटल व पारदर्शक आदर्श आपले सरकार सेवा केंद्राच्या संकल्पनेला चालना दिली. हे केंद्र नागरिकांसाठी सरकारी सेवा व खाजगी सेवा तसेच विभिन्न सेवा अधिक सुलभ व जलद करण्याच्या दृष्टीने क्रांतिकारक ठरेल. तसेच केंद्र उभारणीसाठी लागणाऱ्या सर्व साधनसंपत्तींचे नियोजन, कार्यप्रणाली, आणि लोकसहभाग या सर्व बाबींमध्ये त्यांनी मार्गदर्शन केले.सौरभ जैन यांचा या प्रकल्पात केवळ सहभाग नव्हे, तर दृढ नेतृत्व, दूरदृष्टी आणि समाजहिताची भावना हे सर्व पैलू ठळकपणे जाणवतात. त्यांच्या या मोलाच्या वाट्यामुळेच "आदर्श आपले सरकार केंद्र" हे इतरांसाठीही प्रेरणादायी मॉडेल ठरेल असे जाणवते.आदर्श आपले सरकार केंद्र" हे वाशिम जिल्ह्यातील नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण सुविधा ठरणार आहे, ज्यामुळे शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी त्यांना आता अधिक सुलभता मिळणार आहे.प्रसंगी नायब तहसीलदार गजानन जवादे,नायब तहसिलदार कुलमूथे ,अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



# ग्रामिण कृषि कार्यानुभव विद्यार्थी प्रशिक्षण

## या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आशिष आपतुरकर

रिसोड : डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलग्नित कृषी महाविद्यालय रिसोड अंतर्गत अंतिम वर्षात शिकणाऱ्या व ग्रामीण कृषि कार्यानुभव ( रावे) या अभ्यासक्रमास नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरता ३ जून २०२५ ते ५ जून २०२५ या तीन दिवसीय कालावधीत महाविद्यालयाच्या प्रशिक्षण सभागृहात रावे ओरिएंटेशन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आशिष आपतुरकर यांचे शुभहस्ते ३ जून २०२५ रोजी झाले व ५ जून २०२५ ला या प्रशिक्षण वर्गाची सांगता कृषी महाविद्यालयाचे समन्वयक व कीटक शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिम राजेश डवरे यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आली .

या प्रशिक्षण वर्गाचे प्रास्ताविक डॉ परमेश्वर देवडे रावे कार्यक्रमाधिकारी कृषी महाविद्यालय रिसोड यांनी केले . उद्घाटन पर मार्गदर्शनात डॉ आशिष आपतुरकर यांनी विद्यार्थ्यांनी आगामी रावे कार्यक्रमांमध्ये कृषी तंत्रज्ञान दुधाची भूमिका पार पाडावी असा संदेश दिला.

तर समारोप या कार्यक्रमांमध्ये विशेष अतिथी राजेश डवरे यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना स्पष्ट करून आगामी खरीप हंगामात विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांकरिता आदर्श प्रात्यक्षिक व कृषी विस्तार कार्यक्रमाचे आयोजन करावे असा संदेश दिला तर दिनांक ५ जून २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या समारोपीय कार्यक्रमांमध्ये विशेष अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना कीटक शास्त्रज्ञ राजेश डवरे यांनी यांनी विद्यार्थ्यांनी आगामी खरीप हंगामामध्ये कृषी विद्यापीठाचे कमी खर्चाचे शाश्वत तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाच्या मार्फत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे असे आव्हान केले .(वि. प्र)

### कार्यक्रमाला अनेकांची उपस्थिती

प्रशिक्षण वर्गामध्ये डॉ परमेश्वर देवडे प्रा कृष्णा देशमुख प्रा विठ्ठल बोडके प्रा डी टी बोरकर प्रा मनोज जाधव प्रा कल्याणी वानखेडे प्रा निलेश खडसे प्राध्यापक एल बी काळे या व इतर कृषी महाविद्यालय रिसोडच्या विविध विषयाच्या प्राध्यापकांनी आपली संबंधित विषयासंदर्भात आयोजित करावयाची विविध प्रात्यक्षिके व शेड्युल या संदर्भात तांत्रिक सादरीकरण केले या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कृषी महाविद्यालय रिसोडच्या विद्यार्थिनी यांनी बीज प्रक्रिया व बियाणे उगवण क्षमता तपासणी बाबत कृती प्रात्यक्षिकाचे आयोजन केले इतर विद्यार्थ्यांकर्ता तांत्रिक संदेश दिला या या संपूर्ण प्रशिक्षण वर्गाचे सूत्रसंचालन डॉ परमेश्वर देवडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रयोगशाळा सहाय्यक दीपक गायकवाड यांनी केले .

# पराभवाचे आधी चिंतन करा

## देवेंद्र फडणवीस यांचे राहुल गांधींना उत्तर



मुंबई: विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निर्भेळ नसल्याचा आरोप केला होता. त्यांनी विविध वृत्तपत्रात याविषयीचा लेखच लिहिला. त्यात महाराष्ट्रानंतर बिहारमध्ये मॅच फिक्सिंग होण्याची भीती व्यक्त केली होती. त्यांनी लेख लिहिला होता. त्या लेखाला आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही 'जनता त्यांना नाकारते जे जनादेश नाकारतात' या शिर्षकाखाली लिहिलेल्या लेखात राहुल गांधी यांना उत्तर दिले आहे. त्यांनी पुराव्यांसह सर्व आरोप खोडून काढले. एकदा पराभव स्वीकारुन आपण कुठे चुकतो आहोत, जनतेशी आपला कनेक्ट कुठे कमी पडतो, त्यासाठी काय केले पाहिजे, याचा विचार केला तर ते अधिक संयुक्तिक ठरेल असा सल्ला फडणवीस यांनी राहुल गांधींना दिला.

लेखाची सुरुवात गडचिरोली दौऱ्यापासून बंदुक घेतलेला नक्षलवादी संपविणे सोपे, पण अर्बन नक्षली मानसिकता संपवायला वेळ लागेल. भारत जोडोच्या नावाखाली चालविलेल्या भारत तोडो अभियानात किती डॉ. मनमोहन सिंग यांनी ठरविलेल्या किती नक्षली संघटना होत्या, याचे स्मरण करुन दिले . एकदा पराभव स्वीकारुन आपण कुठे चुकतो आहोत, जनतेशी आपला कनेक्ट कुठे कमी पडतो, त्यासाठी काय केले पाहिजे, याचा विचार केला तर ते अधिक संयुक्तिक ठरेल असा सल्ला फडणवीस यांनी राहुल गांधीना दिला. बिहारसह आगामी विधानसभा निवडणुकांच्या पराभवाची कारणेही त्यांना आतापासून तयार करायची आहेत, असा टोला ही त्यांनी लगावला. यावेळी फडणवीस यांनी त्यांना मुद्देसूद उत्तरं दिली.

राहुल गांधी हे सातत्याने लोकशाही प्रक्रियेचा अपमान करतात. सातत्याने जनादेशाचा अपमान करतात. जनतेने राहुल गांधीना नाकारले, त्याचा बदला म्हणून ते जनतेला नाकारत आहेत. यातून काँग्रेस पक्ष आणखी गर्तेत जाणार, असे फटकारे फडणवीस यांनी लेखातून लगावले. आपल्याच पक्षाचे आमदार राहुल गांधी यांची एक दिवसात भेट घेऊन दाखवा, अशी विधाने का करतात? यावर त्यांनी आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

### प्रक्रियेनुसार माहिती मागा, उत्तर देऊ- निवडणूक आयोग

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरीचा आरोप केल्यानंतर २४ तासांनंतरही लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला कोणतेही पत्र लिहिलेले नाही. तसेच त्यांनी बैठकीसाठी वेळ मागितलेला नाही.

निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, एकीकडे राहुल गांधी म्हणतात की, त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे गंभीर आहेत, परंतु जेव्हा निवडणूक आयोगाला पत्र लिहिण्याची वेळ येते तेव्हा ते टाळाटाळ करतात. प्रक्रियेनुसार, राहुल गांधी यांनी पत्र लिहिले तरच कोणतीही संवैधानिक संस्था औपचारिकपणे प्रतिसाद देऊ शकते.

### 'जनता तुम्हाला माफ करणार नाही'

**मुख्यमंत्री म्हणाले,-** सातत्याने लोकशाही प्रक्रियेवर आणि संवैधानिक संस्थांवर शंका उपस्थित करुन आपण देशाला कोणत्या दिशेने घेऊन जात आहोत, कोणते विष कालवत आहोत, याचे भान ठेवले पाहिजे. महाराष्ट्रात झालेला पराभव हा किती जिव्हारी लागला, याची मला जाणीव आहे. पण, सातत्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा, लाडक्या बहिणींचा, सामान्यजनांचा आणि इतरही नागरिकांच्या कौलाचा तुम्ही असा अपमान करणार असाल, तर महाराष्ट्रातील जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही.

### आयोगाऐवजी भाजप उत्तरे देत आहे- चेन्नीथला



निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरच संशय बळावला असल्याने या गंभीर प्रश्नांची उत्तरे निवडणूक आयोगाने देऊन संभ्रम दूर करणे अपेक्षित असताना भाजपाकडून त्याची उत्तरे दिली जात आहेत हे आणखी गंभीर असून निवडणुकीत मॅच फिक्सिंग झाले यावर शिक्कामोर्तब करणारे आहे, असे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी म्हटले आहे.

### निवडणूक आयोगाने उत्तर देणे अपेक्षित - हर्षवर्धन सपकाळ



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, राहुल गांधी यांनी काल काही प्रश्न उपस्थित केले होते, भाजपवर त्यात थेट आरोप नव्हता. लोकशाही वाचण्याच्या दृष्टीने वस्तुनिष्ठ प्रश्न उपस्थित केले. निवडणूक झाल्यापासून राहुल गांधी सदर मुद्याचा पाठपुरावा करत आहेत. निवडणूक आयोगाने यावर उत्तर देणे अपेक्षित आहेत. मात्र, याची उत्तरे देवेंद्र फडणवीस व अमित शाह देत आहेत, असा टोला सपकाळ यांनी लगावला आहे. पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी आज लेख लिहिला आहे. गोंधळलेल्या परिस्थितीत हा लेख लिहिला आहे.

# ॲग्रोव्हिजनची नागपुरात आंतरराष्ट्रीय दर्जाची ॲग्री बिझनेस स्कूल

◆ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा

◆ स्पेनमधील तज्ज्ञांनी केला विदर्भ दौरा: संत्रा उत्पादकांशी साधला थेट संवाद

नागपूर: विदर्भातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळावी आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानामध्ये तरुणांना प्रशिक्षित करून सक्षम करणे हे ॲग्रोव्हिजनचे ध्येय असून, याच माध्यमातून नागपुरात 'ॲग्रोव्हिजन ग्लोबल ॲग्री बिझनेस स्कूल' सुरू करण्याचा निर्धार केला असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांनी सांगितले आहे.

या उपक्रमाच्या तयारीसाठी स्पेनमधील एक उच्चस्तरीय तज्ज्ञ शिष्टमंडळ शुक्रवारी विदर्भाच्या दौऱ्यावर आले होते, या शिष्टमंडळाशी चर्चा करताना ते बोलत होते. विदर्भातील संत्रा व फलोत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उत्पादन वाढवण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने स्पेन येथील डेव्हीस मॉरेनो, फ्रांसिस्को जॅव्हियर आणि जॉन अँटोनिओ या तज्ज्ञांनी संत्रा उत्पादक क्षेत्रांचा दौरा करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. शेतकऱ्यांच्या गरजा, अडचणी आणि संधी यांचा त्यांनी अभ्यास केला. दौऱ्यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि नागपुरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ॲग्री बिझनेस स्कूल सुरु करण्यास सहमती दर्शविली.

ना. नितीन गडकरी यांनी या शिष्टमंडळाशी चर्चा करताना सांगितले की, 'विदर्भातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड दिल्यास उत्पादन आणि गुणवत्तेत लक्षणीय वाढ होऊ शकते.



यासाठी जागतिक स्तरावरचे तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योगातील कौशल्ये आणि निर्यात केंद्रित दृष्टीकोन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे.

ते पुढे म्हणाले, शेती ही एक फायदेशीर व्यवसायिक प्रक्रिया होऊ शकते, फक्त त्यासाठी योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ॲग्रोव्हिजन ॲग्री बिझनेस स्कूल हे या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. विदर्भातील तरुणांना जागतिक कृषी नवकल्पनांची माहिती मिळावी, त्यांना स्टार्टअप्स व निर्यातीसाठी मार्गदर्शन व्हावे, हा आमचा उद्देश आहे.

यावेळी कांचनताई गडकरी यांच्यासह,ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर, मार्गदर्शक डॉ. सी. डी. मायी, महाऑरेंज चे अध्यक्ष श्रीधर ठाकरे, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे प्रशांत कडू, ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे सदस्य आनंदराव राऊत, सुधीर दिवे, डॉ. कलंत्री, डॉ. पिनाक दंदे आदींसह संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# रिसोड शहराचा वाढीव पाणी आरक्षण मागणी मुख्यमंत्र्याकडुन पूर्ण

**मुख्यमंत्री फडणवीस यांचे माजी खा. देशमुख व भाजप नेते ॲड. नकुल देशमुख यांनी भेट घेऊन मानले आभार**



**रिसोड** : रिसोड शहरासाठी आवश्यक असलेली वाढीव पाणीपुरवठा योजनेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिल्यामुळे शहराच्या महत्त्वाचा पाणी प्रश्न कायमचा सुटणार आहे त्यामुळे माजी खासदार अनंतराव देशमुख व युवा नेते नकुल भैया देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री यांची प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे आभार व्यक्त केले.

१३ एप्रिल २०२३ रोजीच्या संकल्प सभेत माजी खासदार अनंतरावजी देशमुख ,भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख नकुलदादा देशमुख यांनी रिसोड शहरसाठी वाढीव पाणी आरक्षणाची मागणी केली होती. राज्याचे तात्कालीन उपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी २९ जुलै २०२४ रोजी मागणी मान्य करत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थानअभियान तसेच केंद्र शासन पुरस्कृतअमृत २.० योजने अंतर्गत रिसोड शहराचे वाढीव वाढीव पाणी आरक्षण मंजूर केले होते आणि माजी मंत्री देशमुख, नकुल देशमुख यांची ही मागणी पूर्ण केली होती, सोबतच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सदर पोस्ट त्यांच्या अधिकृत फेसबुक पेजवर शेअर केली होती.

रिसोड शहरांचा अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मार्गी लावल्याच्या अनुषंगाने मा. मंत्री अनंतरावजी देशमुख ,भाजपा नेते नकुलदादा देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेत त्यांचे रिसोड शहर वाशीयांच्या वतीने वाढीव पाण्याचा महत्वपूर्ण प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आभार व्यक्त केले. सोबतच रिसोड मालेगाव विधानसभा क्षेत्र तसेच वाशिम जिल्ह्यातील विविध विकासकामांच्या विषयावर चर्चा केली. (वि. प्र)

# नक्षलवादाची कंबर मोडणार! – मुख्यमंत्री



**गडचिरोली** : 'नक्षलवाद महाराष्ट्रातून जवळपास संपला असून, आता उरलेल्या नक्षलवाद्यांनी देखील शस्त्रास्त्र खाली टाकून मुख्य प्रवाहात यावे,' असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली येथे दिला. त्यांच्या उपस्थितीत तब्बल १२ हार्डकोर नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले.

जे नक्षलवादी समर्पण करतील त्यांना शासनाच्या धोरणानुसार पुनर्वसनाची संधी मिळेल. मात्र जे अद्याप हिंसेचा मार्ग पत्करतील त्यांच्यावर कठोर कारवाई होणार आहे,' असे फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी यावेळी एका सामूहिक विवाह सोहळ्यातही सहभाग घेतला, जिथे १३ माजी नक्षलवादी नवजीवनाची सुरुवात करत विवाहबंधनात अडकले. 'जंगलात बंदुकीसोबत हिंसक संघर्ष करणाऱ्या या तरुणांनी आता आपल्या जीवनाला नवसंजीवनी दिली आहे. ही परिवर्तनाची आशादायक दिशा आहे,' असे फडणवीस म्हणाले.

**वैनगंगा नळगंगा नदीजोड योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्याच्या रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील प्रस्तावित को,पो, बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर करा..**

# लखनसिंह ठाकुर यांनी मुख्यमंत्र्याकडे पत्राद्वारे केली मागणी



*रिसोड .. रणजित सिंह ठाकुर*

*महाराष्ट्र राज्याचे सिंचन विकास पुरुष तथा कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भाजपाचे लखनसिंह ठाकुर यांनी वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुका हा सिंचनाच्या बाबतीत अत्यंत मागासलेला भाग आहे सिंचन विकासाच्या दृष्टीने कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर केल्याशिवाय पर्याय उपलब्ध होणार नाही वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदीवरील बाळखेड, धोडपभापूर पेन आसेगाव या पाच को,पो, बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून सर्वच लोकप्रतिनिधी शेतकरी व जिल्ह्यातील भाजप पदाधिकाऱ्यांची आहे तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब मुख्यमंत्री असताना तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन साहेब असताना अनेक वेळेस या ५ हि बॅरेजला मंजुरी मिळण्यात यावी याकरिता मंत्रालयीन दालना मध्ये बैठकी सुद्धा पार पडल्या या सर्व कोल्हापुरी बंधाऱ्याचे रूपांतर मॅरेजेस मध्ये व्हावा हा पाठपुरावा मी अनेक वर्षापासून करीत आलेला आहो परंतु या प्रकल्प करिता पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाशिक जलविज्ञान केंद्राकडून न भेटल्यामुळे प्रकल्पाचे प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तयार असून सुद्धा सदर प्रकल्प अनेक वर्षापासून रखडलेले आहे तथापि आपल्या पैनगंगा नळगंगा नदीजोड या महत्त्वकांक्षी योजनेमध्ये टप्पा क्रमांक ४ नळगंगा धरण ते पैनगंगा व वाशिम जिल्ह्यातील तुटीचे क्षेत्र याचा समावेश आहे तरी या महत्त्वकांक्षी योजनेअंतर्गत रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील वालखेड, धोडप, भापूर, मसला पेन व आसेगाव या पाच को पो बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्याचा समावेश करण्यात यावा सदरच्या कामाचे सर्वेक्षण करणेबाबत आपल्या स्तरावरून निर्देशित करण्यात यावे ही विनंती अशा आशयाचे पत्र भाजपा उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेशाचे सचिव लखनसिंह ठाकुर यांनी एका पत्राद्वारे केले वैनगंगा नळगंगा नदी जोड योजनेअंतर्गत सदर प्रकल्प समाविष्ट केल्यास उपरोक्त बालखेड धोडप, गोहोगाव, सरपखेडा एकलासपूर मसला पेन महागाव वाडी वाकद एकलासपूर या गावातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ क्षेत्राच्या दृष्टीने विशेष लाभ घेता येणार आहे असे त्यांनी सांगितले*



**▮राज्य सरकारचे मोठे पाऊल**

**▮राज्यभरातील सर्व शाळांना आदेश जारी**

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नवे नियम

**मुंबई**: शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. महाराष्ट्रात यापूर्वी झालेल्या गुन्हेगारीच्या घटना घडल्या आहे.

अगदी बदलापूर शाळेतील मुलीवर लैंगिक शोषण असो वा बसमध्ये शालेय विद्यार्थीनीवर विनयभंगासारख्या घटना असो. यासाठी राज्य सरकारकडून पूर्वयोजना केल्या जात आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शालेय बस चालकांची पार्श्वभूमी तपासली जाणार आहे. दर आठवड्याला त्यांची मद्यपान व औषध चाचणी करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. शालेय विभागाने जारी केलेले नवीन नियम राज्यातील सर्वच शाळांना लागू करण्यात आले आहेत. शालेय शिक्षण विभागाने जारी केलेल्या निर्णयानुसार चालक, सफाई कामगार, महिला सेविकांची सकाळी आणि सायंकाळी अशी दोने वेळेस चाचणी होणे गरजेचे आहे. अनधिकृत व्यक्तींना बसमध्ये प्रवेश करता येणार नसल्याचे सांगितले जात आहे. तसेच खाजगी वाहनांमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी चालकाची ओळख व पार्श्वभूमी शाळेला कळवावी, अशी सूचनाही शासन निर्णयामध्ये करण्यात आल्या आहेत.

# जागतिक पर्यावरण दिन विशेष वृक्षारोपण उपक्रम




रिसोड: जागतिक पर्यावरण दिनाचे रिसोड नगरपरिषद च्या वतीने मा. सतीश शेवदा, प्रशासक तथा मुख्याधिकारी नगरपरिषद रिसोड यांच्या अध्यक्षते खाली वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला व हरित शपथ घेण्यात आली.

या उपक्रमांतर्गत रिसोड शहरातील शेपन भूमि या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण शहरातील , प्रतिष्टीत नागरिक, कॉलनीतील महिला सदस्य, लहान मुले, नगरपरिषदेतील कर्मचारी यांच्या हस्ते उत्साहाने करण्यात आले.

कार्यक्रमास नगर परिषदेचे पाणी पुरवठा अभियंता नंदकिशोर डाखोरे रोहित बढ़ेल स्वच्छता निरीक्षक, सहायक प्रकल्प अधिकारी आर एस पट्टेबहादूर कार्यालय अधीक्षक सुनिल मगर, कर निर्धारक शिवनन्दन बर्डे, वरिष्ठ लिपिक प्रताप देशमुख, शहर समन्वयक इंजि. मुजम्मिल मनियार तसेच कार्यालयीन कर्मचारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाचा उद्देश पर्यावरण संवर्धनास चालना देणे आणि महिलांच्या सहभागातून हरित चळवळीला बळकटी देणे हा होता 'वृक्ष लावा, पर्यावरण वाचवया उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनासाठी महिलांचा सक्रिय सहभाग वाढवण्यास मदत होईल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. (वि. प्र)

# डिजिटल मीडिया पत्रकारांसाठी शासनाचा मोठा निर्णय !

**मुंबई** : डिजिटल मीडियावर काम करणाऱ्या सर्वच डिजिटल पत्रकारांना शासन दरबारी हक्काच्या जाहिराती मिळाव्यात यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे व संपूर्ण डिजिटल मीडिया परिषद सातत्याने पाठपुरावा करत होती. आज अखेर या संघटनात्मक पाठपुराव्याला यश आले असून, राज्य सरकारने ३ जून २०२५ रोजी एक शासन निर्णय जाहीर करून डिजिटल मीडियावरील फेसबुक, युट्युब आणि इन्स्टाग्राम या माध्यमातून पत्रकारिता करणाऱ्या डिजिटल पत्रकारांना हक्काचा रोजगार देण्यासाठी शासकीय जाहिराती सुरू केल्या आहेत.



गेल्या अनेक दिवसांपासून मराठी पत्रकार परिषद संलग्न डिजिटल मीडिया परिषद यासाठी सातत्याने विविध मंत्र्यांना भेटून डिजिटल मीडियाबद्दलची सखोल माहिती देत होते आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून कशा पद्धतीने शासनाच्या जाहिराती लोकप्रिय होतील याबद्दल सांगत होते. अखेर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्वच मंत्र्यांनी एकमत दाखवत डिजिटल माध्यमांना जाहिराती सुरू करण्याचा एक मोठा निर्णय घेतला आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद व डिजिटल मीडिया परिषदेकडून स्वागत करण्यात आले असून, डिजिटल मिडियामध्ये काम करणाऱ्या पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका मिळावी. यासाठीसुध्दा मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मिडिया परिषद सरकारकडे पाठपुरावा करीत असल्याचे मत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी स्पष्ट केले.